एच.यु.एफ.तर्फे कर्ता व पुढारी श्री. शामकांत दिनकर भोसले यांनी दिनांक 02 / 08 / 2018 रोजी लिहुन दिलेला आहे. सदरचा खरेदीखताचा दस्त लिहुन देणार यांचे लाभात दिनांक 03 / 08 / 2018 रोजी मे.सह दुय्यम निबंधक कार्यालय नाशिक -1 यांचे कार्यालयात अं.नं. 6441 / 2018 अन्वये नोंदविलेला आहे. सदर फरोक्त खरेदीखतान्वये सदर प्लॉट मिळकतीचे 7/12 उताऱ्यावर फेरफार नोंद नं. 36377 अन्वये मालक सदरी लिहुन देणार यांचे नावाची नोंद झालेली असुन खरेदीनंतर मिळकतींचा कब्जा व मालकी हक्क लिहुन देणार यांचाच आहे. तसेच लिहुन देणार यांचा व्यवसाय बिल्डर व डेव्हलपर्सचा असल्याने लिहुन देणार यांनी मालक या नात्याने कलम 1अ मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत विकसित करण्याचे हेतुने आवश्यक त्या परवानग्या मिळवुन लिहुन देणार यांनी वर कलम 1 अ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर " **श्याम अर्पण अपार्टमेंट** " या नावाने इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे बांधकाम आजमितीस प्रगतीपथावर आहे. त्यातील उपरोक्त कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट विक्रीबाबत लिहुन देणार व लिहुन घेणार यांचे दरम्यान बैठक होऊन उपरोक्त फ्लॅट मिळकत लिहुन घेणार यांचे लाभात मालकी हक्काने तबदील करण्याचा सौदा पक्का झाला.त्या नुसार उपरोक्त कलम 1ब उल्लेख केलेल्या फ्लॅटचा विक्री करारनामा आजरोजी लिहुन देणार हे लिहुन घेणार यांचे लाभांत लिहुन नोंदवुन देत आहेत.

**3) बिनशेती परवानगी**:- वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही मे. जिल्हाधिकारी साहेब,नाशिक यांनी त्यांचेकडील हुकुम नं.मह / कक्ष -3 / 4 / बि.शे.प्र.क्र. / 442 / 2011 नाशिक, दिनांक 24 / 01 / 2012 अन्वये बिनशेतीकडे वर्ग केलेली आहे.

**4) मिळकत लेआऊट** :- वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही अंतिम मंजुर ले-आऊट मधील असुन सदरचा ले-आऊट हा मे. सहाय्यक संचालक, नगररचना नाशिक महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जा.नं./ नगररचना



विभाग / अंतिम / सी-2 / 142 दिनांक 30 / 01 / 2013 अन्वये अंतिमरित्या मंजुर केलेला आहे. त्यानुसार सदर प्लॉट मिळकतींचे 7/12 उतारे वेगवेगळे करण्यात आलेले असुन, त्या बाबतची नोंद नं. 29752 मंजुर झालेली आहे.

**5) बांधकाम परवानगी व बांधकाम नकाशा मंजुरी** :- कलम 1 अ मधील प्लॉट मिळकतीवर करावयाचे बांधकामा साठी लिहुन देणार यांनी आर्कीटेक श्री. विनायक किसनराव पाटील व स्ट्रक्चरल इंजि.म्हणुन श्री.रोहन के. घुमरे यांची नेमणुक केलेली असुन त्यांचे देखरेखीखाली ईमारतीचे बांधकाम सुरु आहे. कलम 1 अ मधील प्लॉट मिळकतीवर करावयाचे बांधकामाचा नकाशा नाशिक महानगरपालिका यांनी मंजुर केलेला असुन, मे.असिस्टंट डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी त्यांचेकडील हुकुम नं. एलएनडी / बीपी / मखमलाबाद / मखमलाबाद / डिसीआर / 0479 / 2018 दिनांक 04 / 10 / 2018 अन्वये बांधकाम परवानगी दिलेली आहे व बांधकाम नकाशा मंजुर केलेला आहे सदरचा नकाशा आर्टीकेक्ट व लिहुन देणार यांचे दफ्तरी उपलबध्द आहे.

6) प्रकल्प नोंदणी :- लिहुन देणार यांनी रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट 2016 नुसार वरील प्रकल्पाची नोंदणी केलेली असुन तिचा रजि.नं.------------------ आहे. लिहुन देणार यांनी रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट 2016 नुसार सदरचा करारनामा लिहुन घेणार यांचे लाभात लिहुन दिलेला आहे.व रजिष्ट्रेशन ॲक्ट 1908 चे अधिन राहुन दु.निबंधक साहेब,नाशिक याचे कार्यलयात नोंदवुन देत आहेत.

**7) बांधीव भाग विक्रीचा अधिकार**:- कलम 1अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतींवर लिहुन देणार यांनी बांधकाम सुरु केलेल्या इमारतीतील बांधीव क्षेत्रांची विक्री करण्याचा अधिकार वरील नमुद केल्याप्रमाणे दिनांक 03 / 08 / 2018 रोजी अं.नं.6441/2018 अन्वये नोंदविलेल्या खरेदीखतानुसार मालक या नात्याने मिळालेले आहेत. त्या अनुषंगाने सदर इमारतीतील बांधीव भागांची विक्री लिहुन देणार यांना

Scanned by CamScanner